

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

**डॉ. प्रभाकर देसाई**
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक**

संदर्भ क्र.:विविमं/२०१७–१८/६१५ दि. १०/०१/२०१८

**प्रति,**
मा. प्राचार्य / मा. संचालक / मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषय :–** राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कलाविष्कार स्पर्धेबाबत.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग आयोजित राज्य मराठी विकास संस्था आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कलाविष्कार स्पर्धेच्या वतीने 'रंगवैखरी' ही स्पर्धा आयोजित करण्यात येत असून या वर्षासाठी ''महाराष्ट्री ते मराठी'' या विषयावर आधारित नाटय, चित्र, शिल्प, संगीत या कलांचा एकात्म नाटयाविष्कार याचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा राज्यस्तरीय असून एकूण ८ केंद्रावर भरवण्यात येईल.

याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. सदर पत्र आपल्या महाविद्यालयात/ मान्यताप्राप्त संस्थेत/ पदव्युत्तर विभागातील मुख्य सुचना फलकांवर प्रदर्शित करून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून त्याबाबतची योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

सोबत : माहितीपत्रक.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

## राज्य मराठी विकास संस्था आयोजित

## राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कलाविष्कार स्पर्धा

# रंगवैखरी

मराठी भाषा, साहित्य व महाराष्ट्राची विविधांगी संस्कृती यांसंदर्भातील विविध कार्यक्रम महाराष्ट्रात सातत्याने होत असतात. असे असले तरी महाविद्यालयीन स्तरावर मराठी भाषा या विषयाला केंद्रीभूत मानून त्यायोगे मराठी भाषा, साहित्य व महाराष्ट्राची संस्कृती यांचे सादरीकरण एकाच ठिकाणी करता येईल अशी स्पर्धा आज नाही. हे लक्षात घेऊन मराठी साहित्याबरोबरच नाट्य, चित्र, शिल्प, संगीत, नृत्य या कलांमधून मराठी भाषा व महाराष्ट्रीय संस्कृती यांचे रंगमंचीय प्रकटीकरण करणारी **रंगवैखरी** ही राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा राज्य मराठी विकास संस्थेमार्फत आयोजित करण्यात येत आहे.

**रंगवैखरी** ही आंतरमहाविद्यालयीन कलाविष्कार-स्पर्धा ही मराठीच्या समृद्ध अशा भाषिक साहित्यिक व सांस्कृतिक परंपरेचा मागोवा घेण्याच्या उद्देशाने प्रेरित आहे. महाराष्ट्राचे भाषिक, सांस्कृतिक संचित नाट्य, चित्र, शिल्प, नृत्य, संगीत यांच्या एकात्म कलाविष्कारातून महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रकट करता यावे या हेतूने रंगवैखरी ( वैखरी म्हणजे वाचा, वाणी, भाषा. विविध कलांच्या विविध रंगी आविष्काराने भाषा मंचित केली जाईल म्हणून रंगवैखरी) या अभिनव कलाविष्कार स्पर्धेची मांडणी करण्यात आलेली आहे.

या वर्षासाठी "**महाराष्ट्री ते मराठी**" हा विषय देण्यात आलेला आहे.

"**महाराष्ट्री ते मराठी**" या विषयाच्या अनुषंगाने सादर केल्या जाणाऱ्या एकात्म सादरीकरणात नाट्य, चित्र, शिल्प, नृत्य, संगीत यांच्यापैकी किमान तीन कलांचा समावेश असणे गरजेचे आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाच्या संघातील सर्व कलावंत, लेखक, दिग्दर्शक हे संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थी असणे व स्पर्धेच्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात शिकत असणे बंधनकारक आहे.

**ही स्पर्धा राज्यस्तरीय असून, एकूण ८ केंद्रांवर भरवण्यात येईल. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, रत्नागिरी, औरंगाबाद, सिंधुदुर्ग या केंद्रांवर प्राथमिक फेरी (तालीम स्वरूपात), विभागीय अंतिम फेरी (विभागीय सभागृहात) तर महाअंतिम फेरी मुंबईत घेण्यात येणार आहे.**

**रंगवैखरी ही कलाविष्कार स्पर्धा चार फेऱ्यांमध्ये होईल.**

१) पूर्वप्राथमिक फेरी

२) प्राथमिक फेरी

३) विभागीय अंतिम फेरी

४) महाअंतिम फेरी

पूर्वप्राथमिक फेरीसाठी कथासूत्र तसेच सादरीकरणाची शैली स्पष्टपणे विशद होईल अशा तऱ्हेची ५ ते ७ मिनिटांची दृकश्राव्यफीत तयार करून ती, कथासूत्र व ४० मिनिटांच्या कलाविष्कारासंबंधीचा पूर्ण अंदाज परीक्षकांना येईल अशा सविस्तर टिपणासह संबंधित महाविद्यालयाने राज्य मराठी विकास संस्थेस **rangavaikhari@gmail.com** या इ मेल पत्त्यावर पाठवावी. (ही चित्रफीत मोबाईल फोनच्या माध्यमातून केली तरीही चालणार आहे.)

संस्थेस प्राप्त झालेल्या विविध अर्जांमधून पूर्व प्राथमिक फेरीचे परीक्षक योग्य अशा दृकश्राव्यफीतींची निवड करतील. निवडलेल्या महाविद्यालयांना त्यांच्या प्राथमिक फेरीच्या केंद्रावर तालीम स्वरूपात होणाऱ्या प्राथमिक फेरीत सादरीकरण करण्यासाठी बोलावण्यात येईल. प्रत्येक केंद्रावर होणाऱ्या प्राथमिक फेरीतून परीक्षकांनी निवडलेल्या ४ ते ५ संघांची विभागीय अंतिम फेरी पार पडेल. मेकअप, वेशभूषा, नेपथ्य, प्रकाशयोजना, प्रत्यक्ष संगीत या सर्वांनी युक्त असे रंगमंचीय सादरीकरण असणाऱ्या विभागीय अंतिम फेरीतून त्या त्या केंद्रातून परीक्षकांनी निवडलेल्या प्रथम दोन क्रमांकाच्या संघांना रोख पारितोषिके मिळतील व त्यातील प्रथम क्रमांकाचा संघ मुंबई येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी पुढे पाठवला जाईल. सर्व केंद्रांतून प्रथम आलेल्या आठ महाविद्यालयीन संघांची महाअंतिम फेरी होईल व त्यातून सर्वोत्कृष्ट प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ संघ निवडून त्यांना पारितोषिके प्रदान केली जातील.

## पारितोषिके

### प्राथमिक व विभागीय अंतिम फेरीतील पारितोषिके

०१. प्राथमिक स्तरावरील तालीम स्वरूपातील फेरीसाठी रोख पुरस्कार असणार नाहीत. गुणवत्तेनुसार योग्य तिथे प्रमाणपत्रे दिली जातील.

०२. विभागीय अंतिम फेरीतील सर्वोत्कृष्ट दोन सांघिक सादरीकरणांस अनुक्रमे १५,००० व १०,००० रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात येतील. लेखन, दिग्दर्शन, अभिनय वगैरे वैयक्तिक बाबींसाठी प्रमाणपत्रे देण्यात येतील.

०३. विभागीय अंतिम फेरीतून राज्यस्तरीय अंतिम स्पर्धेसाठी विभागीय अंतिम फेरीतील सर्वोत्कृष्ट संघाची निवड करण्यात येईल. त्या संघाला मुंबईत प्रयोग करण्यासाठी प्रवास वा इतर बाबींसाठी रु. १०,००० इतके अतिरिक्त साहाय्य करण्यात येईल.

महाअंतिम फेरीतील पारितोषिके
०१. सर्वोत्कृष्ट सादरीकरण प्रथम - रु. १,५०,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०२. सर्वोत्कृष्ट सादरीकरण द्वितीय - रु. १,२५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०३. सर्वोत्कृष्ट सादरीकरण तृतीय - रु. १,००,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०४. उत्तेजनार्थ दोन - रु. ५०,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०५. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखक - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०६. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी दिग्दर्शक - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०७. सर्वोत्कृष्ट संगीत - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०८. सर्वोत्कृष्ट नेपथ्य - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
०९. सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
१०. सर्वोत्कृष्ट चित्र - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
११. सर्वोत्कृष्ट शिल्प - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
१२. सर्वोत्कृष्ट अभिनय- पुरुष - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र
१३. सर्वोत्कृष्ट अभिनय- स्त्री - रु. २५,००० + स्मृतिचिन्ह + प्रमाणपत्र

स्पर्धेचे वेळापत्रक

पूर्व प्राथमिक फेरी - १५ जानेवारी २०१८ पर्यंत संस्थेस प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्ज व दृक्श्राव्यफितींतून प्रत्येक केंद्रासाठी दि. १७-१८ जानेवारी २०१८ रोजी १० संघ प्राथमिक फेरीसाठी निवडले जातील.

प्राथमिक फेरी सर्व आठ केंद्रांवर २५ ते २८ जानेवारी २०१८ या काळात पार पडेल.

प्राथमिक फेरीच्या परीक्षकांनी निवडलेल्या ४ ते ५ संघाची विभागीय अंतिम फेरी होईल. सर्व आठ केंद्रांवर दि. १० -१९ फेब्रुवारी २०१८ दरम्यान

विभागीय अंतिम फेरी पार पडेल. त्यातून प्रत्येक केंद्रावरून प्रथम क्रमांकाचा कलाविष्कार महाअंतिम फेरीसाठी निवडला जाईल.

महाअंतिम फेरी २४ फेब्रुवारी २०१८ रोजी मुंबईत पार पडेल.

स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी व नियम आणि अटींसाठी https://sites.google.com/site/rmvsrangavaikhari/ या संकेतस्थळाला भेट द्यावी.

आपले,

डॉ. आनंद काटीकर- प्रभारी संचालक, राज्य मराठी विकास संस्था
श्री. गिरीश पतके -स्पर्धाप्रमुख व कार्यासन अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था
श्री. रवी मिश्रा-समन्वयक सल्लागार

# रंगवैखरी या स्पर्धेचा विषय

# महाराष्ट्री ते मराठी

महाराष्ट्र व महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठीची परंपरा प्राचीन असून तिच्या उगमापासून आजपर्यंत समृद्ध अशा साहित्य, विविध कलांचा वारसा आपल्याला लाभलेला आहे. या विविधरंगी वारश्यातून महाराष्ट्राची विविधांगी संस्कृती विकसित झाली. मराठी माणसाचा कणखर तसेच कलासक्त स्वभाव निर्माण झाला आहे.

रंगवैखरी ही आंतरमहाविद्यालयीन कलाविष्कार-स्पर्धा ही मराठीच्या या समृद्ध अशा भाषिक साहित्यिक व सांस्कृतिक परंपरेचा मागोवा घेण्याच्या उद्देशाने प्रेरित आहे. या स्पर्धेच्या पहिल्या वर्षी म्हणजे २०१८ साली या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयीन संघांसाठी "महाराष्ट्री ते मराठी" हा विषय निवडण्यात आलेला आहे. गाथा सप्तशती या महाराष्ट्री प्राकृत भाषेत लिहिलेल्या ग्रंथापासून महाजलावरही समृद्धतेने विहार करणाऱ्या आजच्या मराठीपर्यंतची विविध रूपे मराठी माणसाने अनुभवलेली आहेत. प्रमाण मराठीतील लिखित साहित्याच्या परंपरेबरोबरच अनेक बोलींमधील मौखिक परंपरांतून विपुल वाङ्मय निर्माण झालेले आहे.

मराठी भाषा व महाराष्ट्राच्या प्रदीर्घ परंपरेतील विद्यार्थ्यांनी आपल्याला योग्य वाटेल अशा कालखंडातील भाषिक, सांस्कृतिक तसेच मराठीच्या विविध बोलींच्या रूपांवर आधारित आपला एकात्म असा सलग ४० मिनिटांचा कलाविष्कार सादर करणे अपेक्षित असेल. त्यात नाट्य, चित्र, शिल्प, संगीत, नृत्य या कलांपैकी किमान तीन कलांचा समावेश असावा. त्यासाठी लिखित साहित्य तसेच मौखिक साहित्य व सांस्कृतिक परंपरा याचा आधार घ्यावा. कलाविष्कार सादर करण्यासाठी कोणत्याही एकाच साहित्यिकाचे साहित्य घेतले तरी चालेल अथवा संपूर्ण कालखंडातील साहित्याचा विचार करून संहिता लिहिली तरी चालणार आहे. कलाविष्कार नाट्य, चित्र, शिल्प, संगीत, नृत्य या माध्यमांतून प्रकट होणारा असला तरी कलाविष्कारांच्या संहितेला निश्चित कथानक / कथासूत्र असणे अत्यावश्यक आहे. या विविध कलांची भेळ असे त्याचे स्वरूप असू नये.

सादर करावयाच्या कलाविष्काराच्या संहितेची निर्मिती करताना ती, मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, कलाप्रकार यांच्या अभ्यासकांची मदत घेऊन विद्यार्थ्यांनी करण्यास हरकत नाही मात्र लेखन तसेच दिग्दर्शन करणारा विद्यार्थी अथवा चमू संबंधित महाविद्यालयाचा आजी विद्यार्थी असणे बंधनकारक आहे.

४० मिनिटांच्या सादरीकरणाची शैली ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य विद्यार्थी दिग्दर्शकाला असेल.